'एसटीपी'च्या माध्यमातून चांगला परतावा मिळवा

गेल्या काही महिन्यांपासून शेअर बाजारात चढउतार पाहवयास मिळत आहे. कधी बाजार उसळी घेतो तर कधी बराच घसरताना दिसतो. अशाप्रकारच्या अस्थिर बाजारात म्युच्युअल फंडमध्ये एसआयपी करणाऱ्यांना भांडवलातही फरक दिसतो. काही जण म्युच्युअल फंडमधील नकारात्मक किंवा कमी परतावा पाहून सर्व पैसे काढून घेण्याचा विचार करतात तर काही जण फंड बदलण्याबाबतचा मुद्दा मांडतात. अशावेळी संपूर्ण पैसे काढण्यापेक्षा आहे त्या कंपनीतच वेगळा फंड निवडण्याचा विचार चांगला राहू शकतो. अशावेळी चढउताराचा फार परिणाम न करणाऱ्या गुंतवणुक योजनेत तुमची गुंतवणूक स्थानांतरित करता येऊ शकते. म्हणजेच म्युच्युअल फंड कंपन्यांनी सिस्टॅमॅटिक इन्वेस्टमेंट प्लॅनप्रमाणेच सिस्टॅमॅटिक ट्रान्सफर प्लॅनची (एसटीपी) सुविधा दिली आहे.

सिस्टॅमॅटिक ट्रान्सफर योजना

सिस्टॅमॅटिक ट्रान्सफर प्लॅन म्हणजेच एसटीपी ही अशी योजना आहे, की त्या माध्यमातून म्युच्युअल फंडमधील गुंतवणूक ही अन्य श्रेणीत स्थानांतरित करू शकतो. उदा. तुम्ही एखाद्या म्युच्युअल फंडच्या पेन्शन प्लॅन श्रेणीत गुंतवणूक केली असेल आणि अलिकडच्या काळात त्यातून चांगला परतावा मिळत नसेल किंवा नकारात्मक स्थितीत परतावा जात असेल आणि परिणामी भांडवल वाढत नसेल तर अशावेळी म्युच्युअल फंड कंपनी गुंतवणुकदारांना 'एसटीपी'ची सुविधा प्रदान करते. याप्रमाणे पेन्शन फंडमधील गुंतवणूक अन्य म्युच्युअल फंड श्रेणीत जसे इन्फ्रास्ट्रक्चर फंड किंवा चिल्ड्रन फंडसारख्या योजनेत स्थानांतरित करणे. या सुविधेनंतर गुंतवणूकदारची रक्कम ही दुसऱ्या योजनेत दरमहा हळूहळू ट्रान्सफर होत राहिल. जुन्या म्युच्युअल फंड योजनेला फंड कंपन्या सोर्स फंड म्हणून पाहतात आणि ज्या योजनेत तुम्हाला गुंतवणूक करायची आहे, त्याला टार्गेट फंड असे म्हणतात.

कंपनी बदलता येणार नाही

तुम्ही सिस्टॅमेटिक ट्रान्सफर प्लॅनची सुविधा घेत असाल तर तुम्हाला त्याच कंपनीच्या दुसऱ्या फंडची श्रेणी निवडावी लागेल. तुम्ही अन्य कंपनीच्या फंडमध्ये गुंतवणूक करायचा विचार करत असाल तर फंड मॅनेजर ही सुविधा देत नाही. एसटीपीची सुविधा ही फंडर्तंगत गुंतवणुकीचा प्रकार बदलण्याची मुभा देते, अन्य म्युच्युअल फंड हाऊसमध्ये जाण्याची नाही.

एसटीपीचे वैशिष्ट्ये

सिस्टॅमॅटिक ट्रान्सफर प्लॅनचा सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे यात किमान आणि कमाल गुंतवणुकीची मर्यादा नाही. अर्थात काही असेट मॅनेजमेंट कंपन्या म्हणजेच 'एएससी' हे गुंतवणूकदारांकडून काही शुल्क आकारू शकतात.

यासाठी कंपनीशी यासंदर्भात चर्चा करायला हवी. कारण कंपन्या नेहमीच एसटीपी सुविधा देण्याच्या नावावर दोन टक्क्यांपर्यंत प्री मॅच्योरिटी एक्झिट लोड वसूल करू शकतात. काही कंपन्या केवळ सेवा शुल्क घेतात, तर काही कंपन्या काहीही शुल्क आकारत नाही. गुंतवणूकदार अन्य कंपनीकडे वळत तर नाही ना, यावर त्यांचे समाधान असते.

हप्त्यानुसार ट्रान्सफर

तुम्ही एखादा फंड दुसऱ्या फंड श्रेणीत ट्रान्सफर करू इच्छित असाल तर किमान सहा हप्ते किंवा त्यापेक्षा अधिक हप्त्यात ट्रान्सफर करावा लागेल. अर्थात या काळात गुंतवणुकदारांना सोर्स फंड आणि टार्गेटेड फंड या दोन्ही श्रेणीतून परतावा मिळत राहिल.

'एसटीपी'चे किती प्रकार

सिस्टॅमॅटिक ट्रान्सफर प्लॅन म्हणजे एसटीपीचे तीन प्रकार आहेत यात पहिले म्हणजे फिक्स्ड ट्रान्सफर प्लॅन यात सोर्स फंडपासून एक निश्चित रक्कम दैनिक, मासिक, सहामाहीच्या आधारावर टार्गेटेड फंडमध्ये ट्रान्सफर होत राहिल. दुसरे म्हणजे कॅपिटल प्रिसिएशन एसटीपी. या प्लॅनमध्ये सोर्स फंडपासून मिळणारा परतावा हा टार्गेटेड फंडमध्ये ट्रान्सफर करण्याची सुविधा असते.

अर्थात फंडवर जेवढे भांडवल मिळेल, तेवढीच रक्कम दुसऱ्या श्रेणीतील फंडमध्ये स्थानांतरित केली जाईल . याचा फायदा म्हणजे आपली मुळ रक्कम ही सोर्स फंडमध्ये कायम राहिल आणि त्यावरही परतावा मिळत राहिल. एसटीपीच्या तिसऱ्या प्रकाराला फ्लेक्सी एसटीपीच्या नावाने ओळखले जाते. याप्रकारच्या योजनेत सोर्स फंडमधून टार्गेटेड फंडमध्ये जमा होणारी रक्कम ही बाजाराच्या चढउतारावर आणि परताव्याच्या दरावर निश्चित केली जाते. उदा. परताव्याचा दर अधिक असेल तर अधिक रक्कम ट्रान्सफर केली जाते. किंवा परतावा कमी असेल तर कमी प्रमाणात रक्कम टार्गेटेड फंडमध्ये ट्रान्सफर होईल.

'एसटीपी'चे लाभ

एसटीपी हे एकाच नाही तर अनेकप्रकारे फायदेशीर आहे. आर्थिक सल्लागाराशी चर्चा करून एसटीपीची सुविधा घेत असाल तर भविष्यात टार्गेटेड फंडमधून अधिक फायदा मिळू शकतो. याशिवाय पोर्टफोलिओच्या अलोकेशनसाठी वेगळे प्रयत्न करण्याची गरज भासणार नाही. उलट फंड श्रेणी बदलल्याने पोर्टफोलिओचा विस्तार होई. उदा. इक्विटी फंड हा सोर्स फंड असेल आणि बँकिंग फंड श्रेणीला टार्गेटेड फंड करत असाल आणि त्याचवेळी कॅपिटल प्रिसिएशन एसटीपीची सुविधा निवडत असाल तर टार्गेटेड फंड हा बँकिंग श्रेणीचा असेल. म्हणजेच अस्थिर इक्विटी श्रेणीतील पैसा तुलनेने स्थिर असलेल्या बँकिंग श्रेणीत टप्प्याटप्याने येईल. एकप्रकारे पोर्टफोलिओत वैविध्यपणा येईल आणि त्यातून चांगला फायदा मिळेल. शिवाय एसटीपीच्या सुविधेने जोखीम देखील कमी राहते. उदा. सोर्स फंड इक्विटी आधारित असेल तर साहजिकच त्यात जोखीम अधिक राहते आणि टार्गेटेड फंड हा डेट श्रेणीतील असेल तर फंडची जोखीम ही आपोआपच कमी होईल.

सावंतवाडीतील धाकोरेत आज श्री देव चव्हाटा जत्रौत्सव

■ सावंतवाडी

सावंतवाडी तालुक्यातील धाकोरे येथील श्री देव चव्हाटा जत्रौत्सव उद्या साजरा होणार आहे. जत्रेदिवशी सकाळी श्री देव चव्हाटा महापूजा, धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. त्यानंतर रात्री जय हनुमान दशावतार नाट्य मंडळ, दांडेली - आरोस यांचा नाट्यप्रयोग होणार आहे. तर रात्री १२:०० वाजता अभंगाच्या नामघोषात श्री देव चव्हाटा प्रदक्षिणा सोहळा आणि फटाक्यांची आतषबाजी होणार आहे. तरी या जत्रौत्सवाचा सर्वांनी लाभ घेण्याचे आवाहन समस्त धाकोरे ग्रामस्थांनी केले आहे.

फिलीपाईन्सच्या ज्वालामुखीचा उद्रेक ८६ हजार लोकांना सुरक्षितस्थळी हलवले

■ मनाली

फिलीपाईन्समध्ये काल झालेल्या ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे जवळच्या परिसरात राहणाऱ्या ८६ हजार लोकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आले आहे. ज्वालामुखीतून निघणाऱ्या राखेचे लोट अनेक किलोमीटर दूरपर्यत पसरले आहेत.

फिलीपाईन्सच्या कानलॉन ज्वालामुखीत मोठा स्फोट झाला. त्यानंतर राखेचे लोट उठू लागले त्याचबरोबर उष्ण लाव्हा पश्चिमेकडील डोंगर उतारावरुन खाली उतरू लागला. या ज्वालामुखीचे उद्रेक सतत होत राहणार असल्याचे फिलीपाईन्सच्या ज्वालामुखी विभागाने म्हटले आहे. या ज्वालामुखीच्या राखेमुळे परिसरात आरोग्याला हानिकारक वायू पसरला. हवेतील राखेमुळे फिलीपाईन्सहून सिंगापूर येथे जाणारे विमान रद्द करण्यात आले. इतरही काही आंतरदेशीय उड्डाणे रद्द करण्यात आली. कानलॉनच्या पश्चिम व दक्षिणेला असलेल्या गावांमधील लोकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आले. कैस्टेलाना शहरातील लोकांनाही सुरक्षितस्थळी हलवण्यात आले. वैज्ञानिक हवेतील विषारी वायुंचे परिक्षण करत आहेत.

'शक्तिपीठ' विरोधात मणेराजुरीत सोमवारी चक्काजाम आंदोलन

■ सांगली

शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करणारा शक्तिपीठ महामार्ग सांगली जिल्ह्यातून रद्दच करावा यासाठी सोमवारी १६ डिसेंबर रोजी विजापूर- गुहागर राष्ट्रीय महामार्गावर तासगाव तालुक्यातील मणेराजुरी येथे चक्का जाम आंदोलन करण्यात येणार आहे.या आंदोलनात शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन महामार्गबाधित शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष दिगंबर कांबळे यांनी केले आहे.

महामार्गासंदर्भात मिरज तालुक्यातील कवलापूर येथे नुकतीच बाधित शेतकऱ्यांची बैठक झाली. यावेळी कांबळे म्हणाले की, शक्तिपीठ महामार्गाबाबत पावसाळी अधिवेशनात बोलताना मंत्री दादा भुसे यांनी शेतकऱ्यांसोबत चर्चेअंतीच निर्णय घेऊ, असे विधान केले होते. लोकसभा व विधानसभा निवडणुकीवेळीही शक्तिपीठ लादणार नसल्याचे शासनाकडून सांगण्यात

आले होते. पण, आता निवडणूक संपताच पुन्हा हालचाली सुरू झाल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महामार्गाला सांगलीपर्यंत विरोध नसल्याचा दावा केला आहे. पण, त्यांची माहिती चुकीची आहे.

शक्तिपीठविरोधी लढ्याची सुरुवात सांगली जिल्ह्यातूनच झाली आहे. सध्या पूर्ण झालेल्या रत्नागिरी-नागपूर महामार्गावर अत्यंत तुरळक वाहतूक असताना नव्याने समांतर महामार्गाची गरज नसल्याचे आम्ही वारंवार सांगत आहोत. महामार्गामुळे हजारो एकर बागायती शेती उद्ध्वस्त होणार आहे. अनेक शेतकरी भूमिहीन होणार आहेत. नदीकाठावरील गावांवर महापुराचे संकट गडद होणार आहे. महामार्ग उंचावरून जाणार असल्याने भराव पडेल, त्यामुळे शेतामध्ये पाणी साचून कित्येक एकर शेती नापिक होणार आहे. त्यामुळे आम्ही महामार्ग होऊ देणार नाही. महामार्गबाधित शेतकरी शेतकरी कामगार पक्षाच्या नेतृत्वाखाली बायका-मुलांसह विधिमंडळावर मोर्चा काढतील.

'आपला दवाखाना' योजनेत ४०० कोटींचा भ्रष्टाचार?

'वन रुपी क्लिनिक'च्या डॉ.राहुल घुलेंचा आरोप

■ मुंबई

वन रुपी क्लिनिकचे संचालक डॉ. राहुल घुले यांनी माजी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. 'आपला दवाखाना' या योजनेत तानाजी सावंत यांनी तब्बल ४०० कोटींचा भ्रष्टाचार केला असून यासंदर्भात आपण न्यायालयात जनहित याचिका दाखल केली असल्याचे डॉ. राहुल घुले यांनी म्हटले आहे.

डॉ.राहुल घुले म्हणाले की, माजी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र शासनाने १० ऑक्टोबर रोजी एचएलएल लाईफ केअर लिमिटेड केरळ या कंपनीला पाच वर्षांसाठी ८६० कोटींचे ३०० 'आपला दवाखाना' चालवायचे काम दिले होते. मात्र या कंपनीला आपला दवाखाना किंवा इतर क्लिनिक चालवण्याचा कोणताही अनुभव नाही. कोणतीही निविदा न काढता मनमानी कारभार करत सावंत यांनी या कंपनीला इतके मोठे काम दिले. या कंपनीची निविदा रद्द करण्याच्या मागणीचा शासनाने पुनर्विचार करावा आणि रुग्णांच्या हितासाठी योग्य ती कारवाई करावी, अशी मागणीही डॉ. घुले यांनी केली आहे.

संगमनेरमध्ये हिंदुत्ववादी संघटनेच्या मोर्चात तांबे, जयश्री थोरात सहभागी

■ संगमनेर

बांगलादेशातील हिंदुंवरील अत्याचाराच्या विरोधात संगमनेरमध्ये आज हिंदू संघटनेने मोर्चा काढला होता. या मोर्चामध्ये आमदार सत्यजीत तांबे, संगमनेरचे आमदार अमोल खताळ आणि बाळासाहेब थोरात यांची कन्या जयश्री थोरात उपस्थित होत्या. हा मोर्चा आज सकाळी संगमनेरमधील लाल बहादूर शास्त्री चौकातून निघून प्रांताधिकारी कार्यालयावर धडकला होता. यावेळी त्यांनी बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचार थांबवले पाहिजे यासाठी मागणी केली. या मोर्चावेळी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. या मोर्चाला जयश्री थोरात आणि सत्यजित तांबे एकत्र उपस्थित असल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या.

बॅलेट पेपरवर मतदानासाठी मोठे जन आंदोलन उभे करू

नाना पटोले यांची घोषणा

■ माळशिरस

लोकशाहीत मतदानाचा अधिकार अबाधित रहावा आणि बॅलेट पेपरवरच मतदान व्हावे, या मागणीसाठी लवकरच भारत जोडो न्याय यात्रेसारखे मोठे जन आंदोलन उभे करू,अशी घोषणा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी येथे केली. ते आज मारकडवाडी ग्रामस्थांच्या भेटीला आले होते. ग्रामस्थांशी संवाद साधताना लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी तुम्ही सुरू केलेल्या लढ्याला काँग्रेस सदैव पाठिंबा देईल,अशी ग्वाही पटोले यांनी दिली.

भारताचे शेजारी पाकिस्तान आणि श्रीलंकेमध्ये लोकशाही संपुष्टात आली आहे. भारतातही लोकशाही संपविण्याचा प्रयत्न सुरू आहे.लोकशाहीत मतदारच राजा असतो. त्या राजाच्या मतांची चोरी केली जात आहे.मारकडवाडीच्या लोकांनी ईव्हिएमवर संशय व्यक्त करून गावातच मतदान घेण्याचा जो प्रयत्न केला त्याची दखल संपूर्ण देशाने घेतली आहे. या छोट्याशा गावाने देशाला नवी दिशा दाखविली आहे. ही लढाई कोण हरला किंवा कोण जिंकला याची पडताळणी करण्यासाठी नाही. लोकशाही जिवंत ठेवण्यासाठीची ही लढाई आहे. या लढाईत काँग्रेस पक्ष भक्कमपणे मारकडवाडीच्या ग्रामस्थांच्या पाठीशी उभा राहील, असे पटोले म्हणाले.

घाटकोपर दुर्घटना आरोपी भिंडेचा जामीन रद्द करा! सरकारची मागणी

■ मुंबई

घाटकोपर येथील महाकाय फलक दुर्घटना प्रकरणातील मुख्य आरोपी भावेश भिंडे याला सत्र न्यायालयाने १९ ऑक्टोबर रोजी जामीन मंजूर केला होता.सत्र न्यायालयाच्या या निर्णयाला राज्य सरकारने उच्च न्यायालयात आव्हान देत त्याचा जामीन रद्द करण्याची मागणी केली.

फलक दुर्घटनेसाठी भिंडे प्रामुख्याने जबाबदार होता याचे ठोस पुरावे आपल्याकडे आहेत. याशिवाय, या दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाला हे एकमेव आणि गंभीर कारण भिंडे याचा जामीन रद्द करण्यासाठी आणि या प्रकरणातून दोषमुक्तीच्या त्याच्या मागणीला विरोध करण्यासाठी पुरेसे असल्याचे सरकारने याचिकेत म्हटले आहे. फलक दुर्घटनेनंतर जनतेत निर्माण झालेला संताप कमी करण्याच्या एकमेव उद्देशाने आपल्याला या प्रकरणात गोवण्यात आल्याचा दावा करून भिंडे याने प्रकरणातून दोषमुक्त करण्याच्या मागणीसाठी सत्र न्यायालयात अर्ज केला आहे. सत्र न्यायालयाने पोलिसांना त्याच्या अर्जावर भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले आहेत.

चौल येथे १४ डिसेंबरला दत्तजन्म सोहळ्याचे आयोजन

■ रायगड

रायगड जिल्ह्यातील चौल येथे १४ डिसेंबरला दत्तजयंतीनिमित्त श्री दत्त जन्म सोहळ्याचे आयोजन केले आहे. या पार्श्वभूमीवर मंदिर प्रशासनाकडून जय्यत तयारी सुरू असून दत्त जयंती उत्सव कालावधीत सर्व दत्त भक्तांनी दर्शनाचा लाभ घ्यावा. असे आवाहन आयोजक अरुण विचारे, दिलीप विचारे, राजेंद्र पाटील आणि भारत वाडकर यांनी केले आहे.

चिनी मांजावर बंदी! दक्षता पथके तपासणी करणार

ठाणे - ठाणे महापालिका प्रशासनाने पतंग उडवण्यासाठी वापरला जाणारा चिनी मांजा, चिनी दोरा, नायलॉन, प्लास्टिकच्या कृत्रिम मांजावर बंदी घातली आहे. यासाठी पालिकेच्या दक्षता पथकामार्फत शहरातील दुकानांमध्ये तपासणी मोहीम राबवून असा चिनी मांजा जप्त करून कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. प्लास्टिक किंवा कृत्रिम पदार्थापासून तयार केलेला चिनी मांजा, चिनी दोरा, नायलॉन, प्लास्टिक कृत्रिम मांजा हा माणसांसाठी तसेच पक्षांना घातक ठरतो. चिनी मांजा म्हणून ओळखला जाणारा हा धागा तयार करण्यासाठी बारिक चूरा केलेली काच, धातू किंवा अन्य तिक्ष्ण पदार्थांचा वापर केला जात असतो. अशा धाग्याचे उत्पादन, विक्री, साठवण आणि वापर यावर राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने निर्बंध घातलेले आहेत.

परळीत व्यापाऱ्याचे अपहरण दोन कोटी खंडणीची मागणी

■ परळी वैजनाथ

परळी शहरातील प्रतिष्ठित युवा उद्योजक अमोल दुबे यांचे काल रात्री अपहरण झाले. दुबे घरी जात असताना त्यांना पाच अनोळखी लोकांनी अडवून मारहाण केली. त्यानंतर त्यांचे अपहरण केले.शहरातील औद्योगिक वसाहतीत उद्योग व व्यापारीपेठ मालक असणारे भाजपाचे ज्येष्ठ नेते विकास दुबे यांचे ते पुत्र आहेत. अपहरणकर्त्यांनी अमोल दुबे यांच्याकडे २ कोटींची मागणी केली. रक्कम सुपूर्द करा, मग सोडून देतो, असे त्यांनी सांगितले. दुबे यांनी घाबरून ३ लाख ८७ हजार रुपये रोख आणि दहा तोळे सोने अपहरणकर्त्यांना दिले आणि स्वतःची सुटका करून घेतली. रक्कम व सोने मिळाल्यानंतर अंबाजोगाई रस्त्यावरील रामरक्षा गोशाळेच्या पुढे अपहरणकर्त्यांनी दुबे यांना सोडून दिले व ते पसार झाले. या घटनेने परळी शहरात मोठी दहशत निर्माण झाली. याप्रकरणी दुबे यांनी परळी शहर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात तक्रार केली.

सांगलीत रस्ते अपघातात १ ठार! ३ जण गंभीर जखमी

■ सांगली

कवठे महांकाळ तालुक्यातील घोरपडी फाट्याजवळ आज सकाळी एका मोटारीचा टायर फुटल्याने अपघात झाला. यामध्ये १ महिला जागीच ठार झाली, तर ३ जण गंभीर जखमी झाले.अमोल वाडकर हे सांगलीहून रत्नागिरी-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरून सोलापूरला नातेवाईकांसह निघाले होते. घोरपडी फाट्याजवळ त्यांच्या गाडीचा टायर अचानक फुटला. त्यामुळे वेगात असलेली कार कोलांट्या मारत सुमारे पाचशे फुटापर्यंत रस्त्याच्या बाजूला जाऊन पडली. या अपघातात सुनीता कल्याणी यांच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्या जागीच ठार झाल्या. तर सुशिला वाडकर, अमोल वाडकर, नीमा पोगले हे गंभीर जखमी झाले.

अदानी ग्रुपकडून चालवला जाणारा कागल तपासणी नाका सुरू

■ कोल्हापूर

कागल तपासणी नाका अदानी ग्रुपच्या माध्यमातून चालविला जाणार आहे. उद्या सकाळी ७ वाजताच्या सुमारास प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा नाका सुरु होणार आहे.

पुणे-बंगळूरू राष्ट्रीय महामार्गावरील कागल सीमा तपासणी नाका विविध कारणांनी वादात सापडला होता. नाक्याच्या बांधकामाची रक्कम न मिळाल्याने पुण्यातील बांधकाम व्यावसायिकाने न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाच्या माध्यमातून तपासणी नाका सुरू होण्याला स्थगिती आणली होती. प्रशासनाला काल हा तपासणी नाका सुरु करायचा होता.

हिमाचलमध्ये बस दरीत कोसळली दोन जणांचा मृत्यू! २० जखमी

■ सिमला

हिमाचल प्रदेशमधील कुल्लू जिल्ह्याच्या आनी भागात एक खासगी बस दरीत कोसळून झालेल्या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला असून वीस जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये चालकाचाही समावेश आहे. आज सकाळी एक खासगी बस करसोगहून आनीला जात होती. यावेळी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास बस दरीत कोसळली. या अपघातात बसचा चक्काचूर झाला. लोकांच्या किंकाळ्या एकून स्थानिकांनी अपघातस्थळी धाव घेत तातडीने मदतकार्य सुरू केले.

दुर्गाडी किल्ल्यावर मशीद नाही मंदिरच!

पान ८ वरुन- दृष्टिकोनातून या गोष्टी असल्याने ही वास्तू मंदिरच आहे, हे शासनाने तेव्हा जाहीर केले होते. १९७६ मध्ये हे मंदिर नसून मशीद आहे, असा दावा ठाणे जिल्हा न्यायालयात चालला. पुढे तो ठाणे जिल्हा न्यायालयातून कल्याण जिल्हा न्यायालयामध्ये वर्ग करण्यात आला. त्यावेळी विरुद्ध पक्षाने असा अर्ज केला की, ही वक्फची जागा आहे. त्यामुळे हा दावा कल्याण जिल्हा न्यायालयात न चालवता वक्फ बोर्डाकडे वर्ग करावा, असाही अर्ज त्यांनी केला होता. तोही कल्याण जिल्हा न्यायालयाने फेटाळला.

मध्य रेल्वे

विविध दुरुस्ती कामे

कामाचे नावः (१) विविध बनावटीच्या वेल्डींग संयंत्रांची दुरुस्ती. (परिमाण २० नग) **अंदाजित किंमत -** ₹ ६,७२,६००/-, **निविदा अर्जाची किंमतः** शुन्य, **ईएमडीः** ₹ १३,५००/-. **पूर्तता कालावधीः** - ९० दिवस. **बंद होण्याचा दिनांकः** ३१.१२.२०२४. **(२)** परेल कारखाना येथे पाणी पुरवठा पाईपलाईनची दुरुस्ती. **कामाची अंदाजित किंमत -** ₹ ३०,५३,९३१.०९, **निविदा अर्जाची किंमतः** शुन्य, **ईएमडीः** ₹ ६१,१००/-. **पूर्तता कालावधीः** - ०६ महिने. **बंद होण्याचा दिनांकः** ०७.०१.२०२५. **वरील ई-निविदा सादरीकरणाची वेळ आणि दिनांक संबंधित बंद होण्याच्या दिनांकांना १७.०० वाजेपर्यंत आहे.** ई-निविदेचे संपूर्ण तपशील अधिकृत रेल्वे वेबसाईट **www.ireps.gov.in** वर उपलब्ध आहेत.

खुली ई-निविदा सूचना क्र.- (१) पीआर-एईई-३८-२४-२५-६८९ दिनांक ०६.१२.२०२४. (२) पीआर-ईएन-२२-२३-६२१ई दिनांक ०७.१२.२०२४ 603

अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे

राणीशिगाव, बोईसर, पालघर जिल्हा, ठाणे, महाराष्ट्र येथील सत्यनगर गृहनिर्माण प्रकल्पातील सर्व संबंधितांकरिता जाहीर सूचना

सॅफायर स्पेस इन्फ्राकॉन प्रायव्हेट लिमिटेड आणि काँगलोम टेक्नोकन्ट्रक्शन्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सह-मालकीचे

(नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ च्या तरतुदींनुसार परिसमापन अंतर्गत)

येथे सर्वसामान्य जनतेस मोठ्या प्रमाणात सूचना देण्यात येत आहे की, **काँगलोम टेक्नोकन्स्ट्रक्शन्स प्रा. लि.**(सीटीपीएल) (CIN U45203KA2007PTC051196) त्यांचे नोंदणीकृत कार्यालय ३३- ४४, १ आणि २, ८ वा मेन, ४था क्रॉस, सदाशिव नगर, आरएमव्ही एक्स्टेंशन, बंगलोर - ५६००८० आणि **सॅफायर स्पेस इन्फ्राकॉन प्रा.लि.** (एसएसआयपीएल) (CIN U45200MH2008PTC179662) त्यांचे नोंदणीकृत कार्यालय २३ एफ, लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट, अंधेरी न्यू लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००५३, **नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ (कोड)** च्या तरतुदींनुसार राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, बंगळुरू खंडपीठाने ०६ जानेवारी २०२१ रोजी आणि मुंबई खंडपीठाने ३० नोव्हेंबर २०२३ रोजी (परिसमापन प्रारंभ तारीख) **(एनसीएलटी)** अनुक्रमे पारित केलेल्या आदेशांनुसार दोन्ही कंपन्या परिसमापन अंतर्गत आहेत. वरील दोन्ही कंपन्या राणीशिगाव (नेवाळे) ता.पालघर, जि. ठाणे, महाराष्ट्र येथे विकसित होत असलेल्या सत्यनगर हौसिंग प्रकल्पाचे विकासक आहेत; ज्याचे तपशील खाली अनुसूची १ अंतर्गत अधिक अचूकपणे वर्णन केले आहेत.

या संदर्भात फॉर्म बी मधील जाहीर घोषणा सीटीपीएल करिता ०४ फेब्रुवारी २०२१ रोजी आणि एसएसआयपीएल करिता ०५ डिसेंबर २०२३ रोजी परिसमापकाद्वारे प्रकाशित करण्यात आल्या आहेत, ज्यात संहितेच्या तरतुदींनुसार सदर कंपन्यांच्या दावेदार/धनकोंकडून दावे सादर करण्याची मागणी केली आहे.

ही सूचना जनतेसाठी आणि विशेषतः सत्यनगर हौसिंग प्रकल्पातील गृहखरेदीदारांना शेवटची संधी म्हणून दिली जात आहे (त्यांच्याकडे सदनिका कायदेशीर आहेत की नाही) ज्यांनी आतापर्यंत आयबीसी, २०१६ च्या तरतुदींनुसार, तत्कालीन रिझोल्यूशन प्रोफेशनलसमोर किंवा परिसमापकासमोर त्यांचे दावे दाखल केलेले नाहीत, त्यांनी **२६ डिसेंबर २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी** अधोस्वाक्षरीकर्तांच्या परिसमापकाकडे त्यांचे दावे सादर करावेत. जर कोणताही दावेदार नमूद केलेल्या वेळेत त्यांचे दावे सादर करण्यात अयशस्वी ठरला, तर सदर कंपन्यांसाठी काम करणारा परिसमापक किंवा त्या कंपन्या (कॉर्पोरेट कर्जदार) किंवा कोणतीही उत्तराधिकारी कंपनी किंवा त्यांचे व्यवस्थापन किंवा मालमत्तेचा कोणताही खरेदीदार कोणत्याही परिणामांसाठी जबाबदार राहणार नाही आणि सदर कंपन्यांची मालमत्ता आणि दायित्वे संहितेच्या तरतुदींनुसार हाताळली जातील जणू काही पुढे परिसमापन तारखेपर्यंत कोणताही दावा नाही.

अनुसूची १

परवडणाऱ्या घरांचा प्रकल्प (म्हणजे सत्यनगर प्रकल्प) खालील कॉर्पोरेट कर्जदारांच्या संयुक्त मालकीचा आहे:

अ. काँगलोम टेक्नोकन्स्ट्रक्शन्स प्रायव्हेट लिमिटेड: (सर्व्हे क्र.१७, ३९/२, ३५/१/ए आणि ३९/२/१ राणीशिगाव (नेवाळे) गाव, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र मधील सर्व स्थावर मालमत्ता येथील सर्व भाग व खंडाचे पूर्ण मालक, अंदाजे मोजमाप क्षेत्र १६.२२ एकर आणि त्यावर बांधलेली संरचना, सत्यनगर प्रकल्पासाठी कंपनीने मिळवलेल्या सर्व सरकारी मान्यता, परवानग्या, परवाने.

ब. सॅफायर स्पेस इन्फ्राकॉन प्रा.लि.: (सर्व्हे क्र.१७/२बी, ३९/२, ३५ आणि ११/१ए राणीशिगाव (नेवाळे) गाव, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र मधील सर्व स्थावर मालमत्ता येथील सर्व भाग व खंडाचे पूर्ण मालक, अंदाजे मोजमाप क्षेत्र १६ एकर आणि त्यावर बांधलेली संरचना, सत्यनगर प्रकल्पासाठी कंपनीने मिळवलेल्या सर्व सरकारी मान्यता, परवानग्या, परवाने.

हरीश कांत कौशिक

काँगलोम टेक्नोकन्स्ट्रक्शन्स प्रायव्हेट लिमिटेड आणि सॅफायर स्पेस इन्फ्राकॉन प्रायव्हेट लिमिटेड चे परिसमापक

नोंदणी क्रमांक: IBBI/IPA-001/IP-P01469/2018-2019/12340

नियुक्तीसाठी अधिकृतता ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वैध

संपर्क पत्ता: १०६, १ला मजला, कनाकिया ॲट्रीयम २, क्रॉस रोड ए, कोर्टयार्ड मॅरियट च्या मागे, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३

ईमेल: rp.sapphireinfracon@gmail.com; conglome.liquidator@gmail.com

संपर्क क्रमांक- +९१९८१९७९९४५५

दिनांक: ११.१२.२०२४.

ई-लिलाव विक्री सूचना

आरएनपी मार्केटिंग ॲण्ड कार्गो प्रायव्हेट लिमिटेडच्या विक्रीकरिता

(परिसमापनाअंतर्गत) (सीआयएनः U01100MH2008PTC187995)

खोली क्र. एफ-२०३, नंदनवन अपार्ट., डहाणुकर वाडी, न्यू लिंक रोड, लालजी पाडा पोलीस स्टेशन समोर, कांदिवली पश्चिम, मुंबई - ४०००६७ महाराष्ट्र, भारत.

(नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अंतर्गत विक्री)

सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई, न्यायालय -। **(निर्णय देणारे प्राधिकरण/एनसीएलटी)** यांच्याद्वारे दिनांक ११.१०.२०२३ रोजीच्या आदेशानुसार **(परिसमापन आदेश)** नियुक्त केलेले आरएनपी मार्केटिंग ॲण्ड कार्गो प्रायव्हेट लिमिटेड **(आरएनपी/कॉर्पोरेट धनको)**, परिसमापनामध्ये,चे निम्नस्वाक्षरीकार परिसमापक कॉर्पोरेट धनकोची - (अ) संपत्तीच्या विक्री मार्गे - कॉर्पोरेट ऋणकोच्या परिसमापन संपत्तीचा भाग बनणाऱ्या कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थावर मालमत्तेची विक्री; आणि/किंवा भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ **(परिसमापन प्रक्रिया)** विनियमन, २०१६ (परिसमापन विनियमन) अन्वये, ई-लिलावाद्वारे **"जसे आहे जेथे आहे तत्त्वावर"**, **"जसे आहे जे आहे तत्त्वावर"**, **"तेथे जे आहे तत्त्वावर"** आणि **"कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर"** विक्री करण्यास इच्छुक आहेत. कॉर्पोरेट ऋणकोशी संबंधित तपशिल https://www.eauctions.co.in/ ईमेल आयडीः admin@eauctions.co.in मोबाईल क्र. +९१ ९८७००९९७१३ येथे उपलब्ध आहेत.

लिलाव दिनांक आणि वेळ	दि. १०.०१.२०२५ **ब्लॉक अ करिता** - स. १०.३० ते दु. १२.३० पर्यंत ५ मिनिटे प्रत्येकीच्या अमर्यादित विस्तारासह पार्सल्समध्ये संपत्तीची विक्री
निविदा कागदपत्रे/बोली सादर करण्याकरिता अंतिम दिनांक	दि. २५.१२.२०२४
पात्र बोलीदारांच्या उद्घोषणेचा अंतिम दिनांक	दि. ३०.१२.२०२४
माहिती सामायिक करण्याचा आणि साईटला भेट देण्याचा अंतिम दिनांक	दि. ०६.०१.२०२५
इसारा रक्कम अनामत (ईएमडी) सादर करण्याकरिता अंतिम दिनांक	दि. ०८.०१.२०२५

राखीव किंमत आणि इसारा रक्कम अनामत खालील तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसारः

ब्लॉक क्र.	संपत्तीचे वर्णन	राखीव किंमत	ईएमडी	बोली विस्तार मूल्य
अ	पार्सल्समध्ये संपत्तीची विक्री - स्थावर मालमत्ता, आयबीबीआय परिसमापन प्रक्रिया विनियमन २०१६ च्या विनियमन ३२(डी) नुसार			
	अ-कृषिक जमीन गाव शिरसाटवाडी, एमएनएस कार्यालयाजवळ, तालुका शिराळा, जिल्हा सांगली-४१५४०५ येथील सर्व्हे क्र. ९, ११, ३०/२ आणि ३२/०२, एकूण क्षेत्रफळ चौ. मीटर्स मध्ये ११९६०.	१,६१,६५,०००	१०%	१,००,०००

कृपया नोंद घ्यावी की, आरएनपी मार्केटिंग ॲण्ड कार्गो प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)करिता ई-लिलाव **दि. १०.०१.२०२५** रोजी करण्यात येईल. **पर्याय अ** कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थावर मालमत्तेच्या संपत्तीच्या विक्रीकरिता लिलाव.

सदर विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे ई-लिलाव सेवा प्रदाता म्हणजेच लिंकस्टार इन्फोसिस प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मार्फत करण्यात येईल. सदर विक्री https://www.eauctions.co.in/ वर उपलब्ध असलेल्या प्रक्रिया मेमोरँडममध्ये विहीत अटी आणि शर्ती आणि खालील शर्तींच्या अधीन असेलः

१. वरील तक्त्यामध्ये निर्दिष्ट केलेले कॉर्पोरेट ऋणकोचे तपशील सर्वोत्तम ज्ञानानुसार नमूद केलेले आहेत.
२. परिसमापकाकडे उपलब्ध असलेली माहिती बोनाफाईड तत्त्वावर आहे. असे स्पष्ट करण्यात येत आहे की, परिसमापक तपशिलाच्या स्थितीच्या अचुकतेबाबत कोणतीही खात्री देत नाहीत.
३. संभाव्य बोलीदारास असाही सल्ला देण्यात येतो की, त्यांनी कॉर्पोरेट धनकोसंबंधी त्यांची स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी.
४. कॉर्पोरेट धनकोची दायित्वे नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम ५३च्या अनुषंगाने निकाली काढण्यात येतील.
५. समाप्ती वेळेच्या शेवटच्या ५ (पाच) मिनिटांमध्ये जर कोणताही प्रस्ताव प्राप्त झाल्यास, बोलीची वेळ आपोआपच पुढील ५ (पाच) मिनिटांकरिता वाढविली जाईल, विस्तारित ५ (पाच) मिनिटांनी लिलाव आपोआपच बंद होईल.

सही/-

जितेंदर कोठारी

आरएनपी मार्केटिंग ॲण्ड कार्गो प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापक

(माननीय एनसीएलटी मुंबई खंडपीठ - । च्या आदेश दिनांक ११.१०.२०२३ नुसार नियुक्त

IBBI/IPA-001/IP-P00540/2017-2018/10965

एएफएः AA1/10965/02/311225/107315 दिनांक ३१.१२.२०२५ पर्यंत वैध.

आयबीबीआयकडे नोंद. पत्ताः ७०२, ऑर्विड ए विंग, एव्हरशाईन पार्क सीएचएस, ऑफ वीरा देसाई रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई - ४०००५३, महाराष्ट्र

आयबीबीआयकडे नोंदणीकृत ईमेल आयडीः jitenderkothari@rediffmail.com

पत्रव्यवहाराकरिता प्रकल्प विशिष्ट ईमेल आयडीः liquidator.rnp@gmail.com

दिनांकः ११ डिसेंबर, २०२४

ठिकाणः मुंबई